सकाळ



मंचर (ता. आंबेगाव) : 'निर्भय कन्या अभियान' कार्यशाळेत सहभागी झालेल्या विद्यार्थिनी व मान्यवर.

# अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात विद्यार्थिनींना 'ज्यूदो'चे प्रशिक्षण

**मंचर :** येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात 'निर्भय कन्या अभियान' एकदिवसीय कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संकटावर मात, रोड रोमिओंना धडा कसा शिकवावा याबाबत मार्गदर्शन व 'ज्यूदो'चे ९२ विद्यार्थिनींना प्रशिक्षण देण्यात आले. आवटे महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ, विद्यार्थिनी मंच व तक्रार निवारण कक्ष यांच्या वतीने आयोजित केलेल्या 'निर्भय कन्या अभियान' कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. के. जी. कानडे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थिनींना सक्षम बनविण्यासाठी 'ज्यूदो-कराटे'चे प्रत्यक्ष प्रशिक्षण व स्व बचावासाठी प्रशिक्षक जयेश थोरात यांनी मार्गदर्शन केले. या प्रसंगी ज्ञानशक्ती विकास वाहिनी स्वयंसेवी संस्थेच्या कार्यकारी संचालिका गार्गी विशाल काळे-वळसे पाटील, उपप्राचार्य डॉ. बी. पी. गार्डी, प्रा. जी. सी. वाघ, प्रा. डॉ. एन. बी आडमुठे, प्रा. कु. अफरोज डांगे, प्रा. टी. वाय. रणदिवे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. व्ही. पी. सुपेकर यांनी केले. व आभार प्रा. डॉ. एस. पी. पानसरे यांनी मानले.

Pune, District-Today
13/02/2022 Page No. 5